# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 09/02/2024 (शुक्रवार) दुपार

---

## जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध नागपूर ग्रामीणची कारवाई

**पो.स्टे. मौदा** :- अंतर्गत मौजा तारसा फाटा ता. मौदा येथे दिनांक ०९/०२/२०२४ चे ०५/५० वा. दरम्यान पोलीस स्टेशन मौदा येथील पोलीस पथक आपल्या स्टाफसह पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त माहिती मिळाली की, काही इसम विनापरवाना व अवैधरीत्या जनावरांना निर्दयतेने कोंबुन वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहिती वरुन मौदा पोलीस पथकाने तात्काळ घटनास्थळी जावून नाकाबंदी करुन बोलेरो पिकअप क्र. MH-31/FC-5081 तसेच बोलेरो पिकअप क्र. MH-36/AA-3017 चे चालक (फरार) हे आपले ताब्यातील वरील दोन्ही बोलेरो पिकअप मध्ये प्रत्येकी पिकअप मध्ये प्रत्येकी १४ जनावरे एकुन २८ गोवंशीय जनावरे आखुड दोरखंडाने तोंड, मान, शिंगे, पाय बांधलेल्या स्थितीत अत्यंत निर्दयतेने कोंबुन त्यांची वाहतुक करीत असतांना मिळुन आल्याने तसेच आपले ताब्यातील वाहन हे भरधाव वेगाने व निष्काळजीपणाने चालवुन तारसा चौकातील रोडच्या कडेला उभ्या असलेल्या ट्रक क्र. MH-40/BL-6333 तसेच ट्रक क्र. MH-40/BL-1687 ला धडक मारून पळुन गेले. त्याचे ताब्यातून १) बोलेरो पिकअप क्र. MH-31/FC-5081 किंमती ८०००००/—रू. २) बोलेरो पिकअप क्र. MH 36/AA- 3017 किंमती ८०००००/—रू ३) दोन्ही वाहनामधील एकुण २८ जनावरे किंमती २,८०,०००/—रू चे असा एकूण १८,८०,०००/— रु. चा मुद्देमाल मिळून आल्याने आरोपीतांविरूद्ध पोस्टे मौदा येथे अप क्र. ११६/२४ कलम ११(१) (ड) (घ) (च) प्राण्यांचा छळ प्रतिबंधक कायदा १९६० सहकलम ५(अ) (१) महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम सहकलम २७९ भा.द.वी सहकलम १८४ मो.वा.का. कायदयान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलिस अधीक्षक हर्ष ए. पोद्दार, मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनात उपविभागीय पोलीस अधिकारी पुंडलिक भटकर, पोलीस स्टेशन मौदा येथील ठाणेदार पोलीस निरीक्षक सतीषसींह राजपुत, पोलीस हवालदार संदीप कडू, गणेश मुदमाळी, रूपेश महादुले, पोलीस नायक दिपक दरोडे, पोलीस अंमलदार अतुल निंबरते यांनी केली.




## शासकीय कामकाजात अडथळा निर्माण करणाऱ्या आरोपीस अटक

पो.स्टे. वेलतूर :— अंतर्गत १० किमी अंतरावर मौजा चन्ना येथे दिनांक ०८/०२/२०२४ चे १३.०० वा. ते १३.३० वा. दरम्यान पोलीस ठाणे वेलतुर येथे दिनांक ०८/०२/२०२४ रोजी फिर्यादी राजेश शंकरराव बारापात्रे, वय ४८ वर्ष, रा. फ्लॅट नं. २०२ जयंती मेनशन ७, बेसा, नागपुर यांनी तोडी रिपोर्ट दिली की, मौजा चन्ना येथे सार्वत्रिक लोकसभा निवडणुक —२०२४ संबंधाने ईव्हीएम. व व्हीव्हीपॅट बाबत जनजागृती प्रचार व प्रसार करित असता **आरोपी नामे—जागेश्वर बाबुराव मोटघरे वय ५५ वर्षे, रा. चन्ना ता. कुही जिल्हा नागपुर** याने फिर्यादी हे शासकीय काम करित असतांना अडथळा निर्माण करून अश्लिल शब्दात शिवीगाळ केली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. वेलतूर येथे आरोपीविरुध्द कलम ३५३, २९४, ५०६ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. यातील आरोपीस अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास सपोनी सतिश पाटील पोस्टे वेलतुर मो नं. ८८०५२ ५३९८२ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर